महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# शुध्दिपत्रक

**जाहिरात क्र.०१/२०२४ - सुधारीत पदांचा तपशील, ऑनलाईन अर्ज सादर करणे व परीक्षेच्या आयोजनाबाबत.**

------

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये अंतर्गत अधिसूचना अंतर्गत पदवीधारक अभियंता-प्रशिक्षणार्थी (वितरण) /(स्थापत्य), पदविकाधारक अभियंता-प्रशिक्षणार्थी (वितरण) /(स्थापत्य) पदे भरण्यासाठी कंपनीच्या संकेतस्थळावर दि. ०२/०१/२०२४ रोजी जाहिरात क्र. ०१/२०२४ प्रसिध्द करण्यात आली होती.

२. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम-२०२४ दि. २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदावरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि.२७.०२.२०२४ अनुसार प्रस्तुत संवर्गाच्या विज्ञापीत जाहिरातीकरीता लागू आहेत. प्रस्तुत प्रकरणी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरीता आरक्षण निश्चित करुन त्यानुसार पदांचा सुधारीत तपशील खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | पदाचे नाव | अ.जा. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.व शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पदवीधारक अभियंता-प्रशिक्षणार्थी (वितरण)- (GET TRAINEE - DIST.) | ०५ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०२ | १५ | ०३ | ०३ | ०१ | ३३ |
| २ | पदवीधारक अभियंता-प्रशिक्षणार्थी (स्थापत्य)- (GET TRAINEE - CIVIL) | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | ०४ |
| ३ | पदविकाधारक अभियंता-प्रशिक्षणार्थी (वितरण) (DET TRAINEE - DIST.) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०३ | ०४ |
| ४ | पदविकाधारक अभियंता-प्रशिक्षणार्थी (स्थापत्य) (DET TRAINEE - CIVIL) | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | ०३ |

**टीप :** वरील परिच्छेदामध्ये नमूद संवर्गातील पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे अथवा आरक्षणामध्ये शासनाच्या आरक्षण धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२. एसईबीसीचा दावा करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र अर्ज करण्यासाठी विहित करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापूर्वीचे असणे आवश्यक आहे. तसेच सदर उमेदवारांकडे सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र अर्ज सादर करताना आवश्यक राहील.

MSEDCL

३. सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ३४६८/२०२४ दाखल करण्यात आली होती. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. १६/०४/२०२४ रोजीचा आदेश व सदर न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर भरती प्रक्रिया करण्यात येईल.

४. मूळ जाहिरात क्रमांक ०१/२०२४ मधील तसेच या जाहिरातीसंदर्भात यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या शुध्दिपत्रकामधील इतर अटी व शर्ती अपरावर्तीत रहातील.

**५. उमेदवारांना अर्ज करण्याकरीता वेबलिंक (URL Link) कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सबब, उमेदवारांनी दि. २७/०९/२०२४ ते दि.०७/१०/२०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत.**

**६.** विषयांकीत जाहिरातींस अनुसरून संगणक प्रणालीवर आधारीत परीक्षा खालील दिनांकास आयोजित करण्यात येत आहेत. :-

| अनु.क्र. | पदाचे नांव | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| १ | पदवीधर शिकाऊ अभियंता (स्थापत्य)<br>Graduate Engineer Trainee (Civil) | २१ ऑक्टोबर, २०२४ |
| २ | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (स्थापत्य)<br>Diploma Engineer Trainee (Civil) | २२ ऑक्टोबर, २०२४ |
| ३ | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)<br>Diploma Engineer Trainee (Dist.) | २३ ऑक्टोबर, २०२४ |
| ४ | पदवीधर शिकाऊ अभियंता (वितरण)<br>Graduate Engineer Trainee (Dist.) | २४ ऑक्टोबर, २०२४ |

७. संगणक प्रणालीवर आधारीत परीक्षांची कार्यपध्दत, परीक्षेचे ठिकाण, प्रवेशप्रमाणपत्र (Hall Ticket), इत्यादी परीक्षेपूर्वी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येईल. सबब उमेदवारांनी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळाचे www.mahadiscom.in चे वेळोवेळी अवलोकन करणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

**सही/-**

**दिनांक : २५/०९/२०२४** **सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं)**

MSEDCL